
# गुलामगिरीतून सुटका

## फ्रेडरिक डग्लसची कथा

चित्र रुपांतर: टेरी वेस्ट



# गुलामगिरीतून सुटका

## फ्रेडरिक डग्लसची कथा

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन

फ्रेडरिक डग्लसच्या आत्मकथेवर आधारित

## फ्रेडरिक डग्लसचे जीवन

लेखकाच्या कल्पनाशक्तितून उत्तमोत्तम पुस्तकांची निर्मिती होते. पण हे पुस्तक एका खऱ्याखुऱ्या व्यक्तिच्या आयुष्याचे चित्रण करते.

फ्रेडरिक डग्लस गुलामगिरीच्या छायेतच लहानाचे मोठे झाले. तब्बल वीस वर्षे त्यांनी गुलाम म्हणून लोकांच्या शेतात काम केले, लाकूडतोड केली, लोकांच्या मुलांचे संगोपन केले.

पण 1838 साली ते पळून गेले. आपण गुलामगिरीत सोसलेल्या जुलुमांवर त्यांनी एक पुस्तक लिहीले. गुलामगिरी प्रथा कशी अयोग्य आहे, हे लोकांना कळावे हा त्यांचा उद्देश होता.


त्यांचे हे पुस्तक अमेरिकेच्या इतिहासात सर्वाधिक प्रसिद्ध आत्मकथा ठरली.

फ्रेडरिक डग्लस लिहितात, “माणूस गुलाम कसा बनतो, हे तुम्ही पाहिलंय. आता गुलाम माणूस कसा बनला, हे तुम्ही पाहा.”



माझा जन्म अमेरिकेच्या *मेरिलँड* राज्यातला. मला आई आठवत नाही. तान्हं बाळ असतानाच मालकाने मला तिच्याकडून हिरावून घेतलं. माझं वय! माहीत नाही.
घोड्यांसारखंच गुलामांनाही आपलं नेमकं वय माहीत नसतं.
माझ्या आईचं नाव होतं, *हॅरियेट बेली.* माझ्या बालपणी आम्ही चार-पाच वेळाच भेटल्याचं मला आठवतंय. ती बारा मैल दूर राहायची.
दिवसभर ती राबायची आणि रात्री मला भेटायला चालत यायची. ती मला अंगाई ऐकवत निजवायची. मी सकाळी जागा व्हायचो तेव्हा ती निघून गेलेली असायची.
शेतात काम करण्यायोग्य वय नव्हतं माझं. कोंबड्यांना बागेत घुसू न देणं, हे माझं काम.
नीट काम कर. नाहीतर फटके देईन.
मला मार फारसा पडला नाही. पण मी नेहमी भुकेला आणि थंडीने गारठलेलो असायचो.
रात्री झोपायला पलंग नव्हता. मी एक मोठी तागाची बॅग चोरली. ती गार फरशीवर ठेवून मी त्यात शिरायचो आणि निजायचो.
रात्री जेवायला उकडलेला मका मिळायचा. एका मोठ्या लाकडी ट्रेमध्ये हा मका ठेवत. मग मुलांना बोलवत. मका खाऊन माझी भूक कधीच भागायची नाही.


भरभर काम करा, आळशी कुत्र्यांनो!
*प्लमर* नावाचा एक माणूस गुलामांच्या कामावर देखरेख करायचा. तो राक्षस होता. तो नेहमी चाबूक आणि दंडुका घेऊन फिरायचा.
एकदा त्याने *हेस्टर* नावाच्या बाईचे हात-पाय बांधले.
माझा हुकूम मोडलास! तुला शिक्षा व्हायला हवी.
मग त्याने तिला चाबकाने फोडून काढलं. तिने खूप गयावया केली, रडली. पण त्याला दया आली नाही. त्याच्या मते, तिचा गुन्हा भयंकर होता.
नंतर अशी मारझोड पाहायची सवय झाली मला.




मी सात-आठ वर्षांचा असताना मालकाने मला दूर पाठवलं.
थोड्याच दिवसांत तुला निघायचं आहे, फ्रेडरिक.
बाल्टिमोरला मी बोटीतून गेलो.
जाताना मी अजिबात मागे वळून पाहिलं नाही.
मी बाल्टिमोरला चाललो होतो. तिथे मला मालकाचे नातेवाईक *हग ऑल्ड* यांच्या घरी राहायचं होतं. मला काही समस्या नव्हती. मी तीन दिवस नदीत स्नान केलं. अंगाला चिकटलेली शेतातली धूळ स्वच्छ केली.
ऑल्ड दांपत्याने दारातच माझं स्वागत केलं. त्यांचा छोटा मुलगा *थॉमस*ही सोबत होता. मला त्याचाच सांभाळ करायचा होता.
स्वागत आहे तुझं, फ्रेडरिक!


*सोफिया ऑल्ड* मला वाचायला शिकवू लागल्या.
चला, हे वाचून दाखवा मला.
याआधी त्यांनी कधी गुलाम ठेवला नव्हता घरी. त्यांचा प्रेमळपणा पाहून मी भारावलो.
पण एकदा मि. ऑल्ड यांना हे कळलं. त्यांनी पत्नीला मला शिकवण्यास मनाई केली.
गुलामाला वाचायला शिकवू नकोस. ते धोकादायक आणि बेकायदेशीर आहे.
फ्रेडरिक वाचायला शिकला की तो स्वत:ची तुलना आपल्याशी करू लागेल.
आपण गुलाम आहोत, याचा त्याला तिरस्कार वाटू लागेल. तो विचार करू लागेल, गुलामगिरीतून सुटण्याचा.
आणि मग हा विचार तो इतर गुलामांशी वाटेल.
मि. ऑल्ड यांचे शब्द माझ्या मनात खोलवर रुजले. मला सुटकेचा मार्ग सापडला. मला लिहा-वाचायला शिकलं पाहिजे.
मग मिसेस ऑल्डची वागणूक बदलली. त्या दगडासारख्या कठोर झाल्या. त्या मला वृत्तपत्रही वाचू देईनात.
किती वेळा तुला सांगायचं?
तू वाचायचं नाहीस.
पण मी प्रयत्न सोडले नाहीत. मी रस्त्यावरच्या गरीब गोऱ्या मुलांना खायला द्यायचो. मग ते मला वाचायला शिकवायचे.
हे बघ फ्रेडरिक, *घर* हा शब्द असा लिहायचा.
HOUSE
सोमवारी घरी एकटाच असताना संपूर्ण दिवस मी लिहीत बसायचो. मी *थॉमसच्या* वहीतल्या रिकाम्या जागांमध्ये लिहायचो.
मी त्याच्या लिखाणाची सावकाश नक्कल करायचो. आमचं हस्ताक्षर हुबेहूब जुळू लागलं.


मी लिहा-वाचायला शिकण्यात काही वर्ष निघून गेली.
मि. ऑल्ड यांनी एक गोष्ट अचूक सांगितली होती. वाचायला शिकल्यावर मी गुलाम आहे, याची मला तीव्रतेने जाणीव झाली.
आता मी बारा वर्षांचा झालो होतो. पुस्तकं वाचू लागलो तसतसं मला या गुलामगिरीचा तिरस्कार वाटू लागला.
सारं आयुष्य मी गुलाम म्हणून जगणार नाही.




चौदा वर्षांचा झाल्यावर मला पुन्हा शेतावर पाठवलं.
माझा नवा मालक खूप क्रूर होता. तो गुलामांना भुकेलं ठेवायचा.
शहरात राहून तू खूप नरम पडलायस. जा, माझा घोडा पकडून आण.
मालक माझ्यावर नेहमी डाफरायचा. त्याच्या घोड्याकडे मी मुद्दाम दुर्लक्ष करायचो. मग घोडा पळून जायचा.
मालकाचा घोडा पाच मैल दूरवरच्या एका शेतात जायचा. तिथे मला काही चांगलं-चुंगलं खायला मिळायचं. मला याची सवय झाली होती.
काळजी करू नका. मी याला आज्ञाधारक बनवतो.
मालकाला हे आवडलं नाही. त्याने मला *एडवर्ड कोवे* नावाच्या माणसाकडे सोपवलं. कोवे गुलामांची इच्छाशक्ती चिरडून टाकायचा.




आठवड्यातून एकदातरी कोवे मला चाबकाचे फटके मारायचा.
माझं ऐकावंच लागेल. नाहीतर पुन्हा फटके देईन.
भयंकर थंडी असो वा भयंकर गर्मी, कोवे आम्हाला कामाला जुंपायचा. आम्ही पावसात आणि हिमवर्षावातही काम करायचो.
थोड्याशा पावसाने कुणी आजारी पडत नाही.
तुम्हाला शिकायचंच नाही वाटतं!
कोवेने मला खूप फटके दिले. माझं शरीर आणि इच्छाशक्ती मरू लागली.
एकदा कोवेने मला धडा शिकवायचं ठरवलं. तो लांब दोरखंड घेऊन तबेल्यात आला. धक्का देऊन त्याने मला खाली पाडलं आणि मला बांधू लागला. त्याला वाटलं, मी त्याच्या ताब्यात आहे.
अरे काय करतोयस तू?
पण माझी इच्छाशक्ती पूर्णपणे मेली नव्हती.
मी कोवेला घट्ट धरलं.
मागल्या सहा महिन्यांपासून तू मला जनावरासारखं मारलंयस.
आता मला कुणाची पर्वा नाही. मी आणखी सहन करणार नाही.
पुढचे दोन तास आम्ही मारामारी केली.
शेवटी, कोवेने मला सोडून दिलं.



या मारामारीनंतर मला जाणवलं, माझं फक्त शरीर गुलाम आहे. पण मन मुक्त आहे.
कोवेकडे वर्षभर राहिल्यावर मला एका नव्या मालकाकडे पाठवलं. तिथे मी गुलामांना गुप्तपणे लिहा-वाचायला शिकवू लागलो.
मी गुलामांशी स्वातंत्र्याबद्दल गप्पा मारू लागलो. मुक्त होण्यासाठी काही करायला ते तयार झाले. मी एक योजना आखली.
SLAVERY
आपण माणूस आहोत आणि आपल्याला मुक्तपणे जगण्याचा हक्क आहे.
अमेरिकेच्या उत्तर भागात गुलामगिरी प्रथा बेकायदेशीर ठरवली होती. आम्हाला तिथे जायचं होतं.
मी प्रत्येक गुलामासाठी प्रवेशपत्र बनवलं. कुणी अडवलं असतं तर ते दाखवता आलं असतं. ते कुणा गुलामाने बनवलं असल्याची शंका अजिबात आली नसती.
I'm afraid.
भीती वाटते.
पळून जायचा दिवस उजाडला. पण सकाळी जाग आल्यावर मला काही गडबड जाणवली. काहीतरी चुकलं होतं.
माझी भीती खरी ठरली. कुणीतरी फितुरी केली होती. आम्हाला अटक झाली. नशीब एवढंच की आम्हाला फासावर लटकवलं नाही.


मला पुन्हा जुन्या मालकाकडे पाठवलं. त्याने मला पुन्हा हग आणि सोफिया ऑल्ड यांच्याकडे पाठवलं.
ऑल्डने मला नोकरी मिळवून दिली. पण माझा बराचसा पगार तो स्वत:कडे ठेवायचा.
हे बारा डॉलर. माझी आठवडाभराची कमाई.
सहा सेंट तुला ठेव.
तरीही मी खूप काबाडकष्ट केले. हा पळून जायची योजना तर बनवत नाही ना, अशी शंका मालकाला येऊ नये म्हणून मी चेहरा नेहमी आनंदी ठेवला. आणि मग एक दिवस.... मी पोबारा केला.


लोकांना कुतूहल होते, मी कसा पळून आलो? पण मी माझी योजना उघड केली नाही, गुप्त ठेवली. कारण इतर गुलामांनाही मुक्त व्हायची संधी मला द्यायची होती.
फक्त एक गोष्ट मी उघड करेन. 3 सप्टेंबर 1838 रोजी मी न्यूयॉर्कला पोहोचलो. आता मी गुलाम नव्हतो, तर स्वतंत्र माणूस होतो.
17


लवकरच मी *ॲना मरे* नावाच्या स्त्रीशी लग्न केलं. आम्ही मॅसेच्युसेट्स राज्यात स्थायिक झालो. तिथे मी मिळेल ते काम केलं. कधी लाकुडतोड केली, कधी कोळसे गोळा केले, कधी धुरांडी साफ केली.
मग मी गुलामगिरीविरुद्ध प्रचार करणारं *लिबरेटर* नावाचं वृत्तपत्र वाचू लागलो.
ते वाचून माझ्यात उत्साह संचारला. माझ्या योजनांना बळ मिळालं. गुलामगिरी संपवण्यासाठी मी जोमाने प्रयत्न सुरू केले.
सुरुवातीला भीड वाटली. पण आपली कथा इतरांना सांगायचीच म्हणून मी गुलामगिरीविरुद्ध चालणाऱ्या सभांमध्ये बोलू लागलो.
उत्तर अमेरिकेने गुलामगिरीचा विरोध केलाच पाहिजे.
गुलामगिरी प्रथा देवाने नाही, तर माणसाने निर्माण केलीय.
गुलामगिरी प्रथा समूळ नष्ट करायलाच हवी.
गुलामगिरी प्रथा हळूहळू संपवून टाकू, या निश्चयाने मी गुलाम लोकांसाठी सातत्याने काम करत राहिलो. आम्हाला यश मिळेल की नाही, माहीत नाही. पण एका गोष्टीची खात्री वाटते, मी या जगात गुलाम म्हणून आलो, पण जाताना स्वतंत्र माणूस म्हणून जाईन.

# आयुष्यभर गुलाम म्हणून जगण्यास त्याने नकार दिला.

- ही एक सत्यकथा आहे.

- फ्रेडरिक डग्लसचा जन्म मेरीलँड राज्यातील बाल्टीमोर शहरात एका गुलामाच्या घरी झाला. त्याच्या मालकाने सांगितले की फ्रेडरिकलाही आयुष्यभर गुलाम म्हणूनच जगावे लागेल.

- मालकाने हेदेखील सांगितले की फ्रेडरिक लिहू-वाचू शकत नाही. ते कायद्याच्या विरुद्ध आहे.

- पण फ्रेडरिकने लिहा-वाचायचा निर्धार केला आणि मग त्याने गुलामगिरीतून मुक्त होण्याचा मार्गही शोधला.